 ISSN:-2347-2723

# पट्टणकुडीची लढाई

**नाईक सी.एम.**

इतिहास विभाग, देवचंद कॉलेज, अर्जुननगर.

## सारांश :

इतिहासामध्ये पट्टणकुडीच्या लढाईला अनन्य साधारण महत्व आहे. या लढहाईमुळे परशुराम पटवर्धनांचा मृत्यू झाला व त्याचा परिणाम पेशव्याची दक्षिंणेकडील शक्ती क्षीण झाली, तसे पाहता छत्रपतींना तोडीस तोड उत्तर देण्याचे काम परशुराम भाऊने केले होते. परंतु सुदैवाने वयाच्या ६५ व्या वर्षी परशुरामभाऊला पट्टणुडीच्या लढाईत पराभव पत्कारावा लागला व त्याचा मृत्यु झाला.

## प्रस्तावना :-

### पटवर्धन-करवीरकर संधर्घाची कारणे :-

सुरुवातीपासूनच करवीरकर व पटवर्धनांचे फारसे पटत नव्हते. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर पेशवे घराण्यात ज्या घटना घडल्या,त्यांचा परिणाम असा झाला की पुण्यातील राजकारणात नाना फडणीस, परशुरामभाऊ पटवर्धन, शिंदे, घाटगे ही मंडळी इतकी गुरफटली होती की त्यांना कर्नाटकाकडे लक्ष द्यायाला वेळ नव्हता. यावेळी दुस-या बाजीरावला पेशवाई मिळाली व पुन्हा एकदा दक्षिण महाराष्ट्रच्या राजकारणाला जोर चढला.

पुण्यात चाललेल्या या राजकीय गोंधळाचा फायदा कोल्हापूर छत्रपतींनी घेतला, कारण पटवर्धन गोखले, सर्जेराव घाटगे, सावंतवाडीचे भोसले, इचलकरंजीचे घोरपडे यांनी कोल्हापूरला वेढलेच होते. या सर्व सदरांचे सामर्थ्य पेशव्यांशी निगडीत होते, तर पेशवाईत गोंधळ होता आणि या परिस्थिीचा फायदा छत्रपतींनी घेण्याचे ठरवले व पटवर्धनांच्या ठाण्यांवर हल्ले करण्याचे ठरवले. सुमारेदहा वर्षे ताब्यात असलेला भूदरगड जिंकण्याचे ठरवले व १७९६ मध्ये हैबतराव गायकवाडाला घेवून सोबत मानाजी घोरपडे, घाटगे यांना घेवून भूदरगडवर हल्ला केला व भूदरगड जिंकला (१). त्यांनतर चिक्कोडी व मनोळी हे दोन तालुके घेतले नंतर हुबळी, नलमधी, संकेश्वर जवळचा वल्लभगड घेतला(२). परशुराम भाऊचा तासगावातील चंदनी वाडयाची राखरांगोळी केली. भाऊने याबाबत पुण्याला पेशव्यांकडे स्वारीची परवानगी मागीतली. या सर्व घटनांचा परिणाम म्हणजे भाऊची पवानगी करवीर कराविरुध्द केली गेली (३).

### परशुराम भाऊची करवीरकरावर स्वारी :-

टिप्पुच्या बंदोबस्तासाठी तयार असणारी फौज भाऊला देवून त्याला करवीरकरावी युध्द पाठवण्याचे ठरले, परंतु पावसाळा असल्याने दस-यानंतर स्वारीचा बेत आखण्यात आला. तर आतापर्यंत सावनुर प्रांतातील ११ ठाणी, पटवर्धन, प्रतनिधी, रास्ते यांच्या सरंजामापैकी बहुतेक मुलुख कोल्हापूरकरांच्या ताब्यात आला, जो ताब्यात घेता आला नाही, तो जाळून टाकला तसेच गोवेकरांच्यावर हल्ला करुन तह केला गेला(४).

परशुराम भाऊने या कोल्हापूर करांचा बंदोबस्त करण्यासाठी जुलै १७९९ मध्ये सुरुवात केली, ऑगष्ट पर्यंत भोज, एक्संबा, सोलापूर, सदलगे, खडकलाट, चिक्कोडी, मनोळी हे तालुके घेतले.

चिक्कोडीचे ठाणे घेतले त्यावेळी शिवाजीराजे बेडकीयाळ येथे होते, स्वत: शिवाराजीराजे साडे तीन महिने तिथे होते. धारवाड, कोण्णूर, सदलगा अशी कोल्हापूरची फौज होती, तर वेदगंगेच्या पलीकडे परशुराम भाऊची फौज होती. भर पावसाळयात दोन्ही फौजा तटस्थ होत्या. कोणाचेही नदी ओलांडण्याचे धाडस होत नव्हते. शेवटी महाराजांनी २ सप्टेंबर,७९९ ला धाडसाने हमीदवाडा येथे डोंग-यांच्या आडोशने वेदगंगा ओलांडली तर भाउचा मुंक्काम पट्टणकुडी येथे चार मैलावर होता.

*** पट्टणुकडीची लढाई:-**

या इतिहासप्रसिध्द लाढईचे वर्णन करवीरकरांचा सैनिक नारो हरी करंदीकर याने लिहलेल्या एक पत्रात केले आहे. दोन्ही फौजा चार मैलावर समोरासमोर होत्या. यावेळी परशुराम भाऊच्या फौजेतील मंडळी फितूर झाल्याचे समजले. नंतर भाद्रपद वलय ३ शके १७२१ रोजी महाराजांनी सगळे मानकरी, शिलेदार, रत्नाकरपंत यांची बैठक घेतली(५). लढाईची मसलत केली, दुपारी भाजनानंतर तोफांचे बैल आणले गेले व शिलेदारास तयार रहाण्यास सांगीतले. पुढे दुपारी निपाणीजवळ करवीर करांची फौज येउुन पोहोचली, तर आप्पासाहेब व भाऊसाहेब हे दोघे दोन भाग करुन उभे राहिले. निपाणीच्या पुढे असणा-या ओढयात शंभर जणाना जखमी करुन पंचवीस तीस ठार झाले, व बाकीचे भाऊचे सैन्य पळून गेले, तर करवचीरकरांचे सरदार धुळोजी पांढरे ठार कले, तर करवीर करांचा निशाणाचा हत्ती माघारी फिरला, तरीसुध्दा महाराजांनी तिनशे लाकांना घेवून व्यवस्था लावली, इतक्यात आप्पासाहोब (रामचंद्र) यांच्या दंडास गोळी लागली, यामुळे पटवर्धनांची फौज उधळली असे म्हणतसंत की यातील बरेच जण फितूर झाले होते. आप्पासाहेब माघारी गेले व निपाणीजवळ असणा-या अमलझरी येथे आस-याला थांबले.

धुळोजी पांढरे ठार झाल्यावर महाराजांच्या फौजेत पळापळ सुरु झाल्यावर महाराजांनी स्वत: त्याचे नेतृत्व केले. प्रथम निशानाचा हत्ती सोडवला नंतर दक्षिणेच्या बाजूने नारायणराव घोरपडे (सेनापती) विश्वासराव घाटगे, गायकवाड तर उत्तरेकडेन रत्नाकर पंत राजाज्ञा यांनी जोरदार हल्ला केली, परशंराम भाऊ बेसावध होता, आप्पासाहोब इतक्या लवकर हार मानेल असे त्याला वाटले नव्हते. सगळया करवीरच्या सैन्याने गोटाला वेढा दिला, सुभानराव बागल यळगुडकर याने भाउंला ओळखले वहैबतराव गायकवाडाने भाऊच्या मानेवर तलवारीचा हल्ला केला, भाउुच्या कानावर, डोक्यार वार झाले, भाउु घायाळ झाला, अशाही परिस्थिती भाऊने चार-पाच जणांना तोडले, परंतु यावेळी त्याच्या जवळचे लोक सैरावैरा पळत सुटले, खुद्द भाउुचा मुलगा आपसाहोब जमखंडीला पळून गला आणि ४ सटेंबर, १७९९ रोजी भाऊ मरण पावला(६). करवीरकरांच्या फौजेने आप्पासाहेबांचा पाठलाग केला, परंतु तो सापडला नाही. भाऊचा तळ लुटला गेला, तीस चाळीस हजाराचे कापड सापडले.

या लढाईच्या वेळी भाऊकडे १०००० च्या आसपास सैन्य होते, तर कोल्हापूरकरांकडे साधारणता : ८ ते ९ हजार सैन्य होते.

**परशुराम भाऊच्या मृत्यूविषयीचा हतिहास:-**

परशुरामभाऊ मरण पावला, परंतु त्यांच्या मृत्यूबाबत अनेक तर्कवितर्क असल्याचे दिसते, कारण सुरुवातीला त्याच्या फौजेतील अनेक लोक फितूर झाल्याचे दिसते, तर इतिहासकार वासुदेव शास्त्री खरे यांच्या मते महाराज गोटात आल्यावर त्यांनी त्याचा वध केला नसून कर लढाईच्या गर्दीत त्याचा वध झाला, असे साांगीतले आहे(७).

परशुरामभाऊ पडल्यानंतर त्याच्या प्रेताबाबत हकीकत मोठी हदयद्रावक आहे. हैबतराव गायकवाडाने भाऊचे प्रत एका बारगीराजवळ दिले, त्याने महाराजांना दाखवले व त्यांनी ते प्रत घोडयावरुन लाथेने उडवले व त्याचे तुकडे तुकडे करवीले, अशा बातम्या पसरल्या गेल्या, परंतु बा.प्र.मोडक यांनी हे चुकीचे वर्णन असल्याचे दाखवून दिले आहे. उलट महाराजांनी मिरजकरांचा कारकून नारो हरी करंदीकर याला सर्व मदत देवून हमीदवाडा येथे भाऊच्या प्रेताचे अग्नीसंस्कार केले व त्याची त्या ठिकाणी समाधी बांधली व पूजा अर्चेची तजवीज केली.

**पट्टणकुडीच्या लढाईचे परिणाम_ :-**

पट्टणकुडीच्या लढाईत भाऊंचा मृत्यू झाला. त्याचा सुड घेण्यासाठी व करवीरकरांचा बंदोबस्त करण्यासाठी रामचंद्र पटवर्धन यांनी पुण्याला जावून पेशवे व नाना फडणीसाची मदत मागीतली. ऊ परशुरामभाऊच्या मृत्युचा बदला घेण्याची विनंती केली.

याचा परिणाम म्हणजेरामचंद्रपंत कोल्हापूरवर चालुन आले. वाटेत सांगलीहुन चिंमणीराव पटवर्धनांची फौज मिळाली. २९ जाने, १८०० रोजी वडगांव जवळ भादोले या ठिकाणी तर फेब्रुवारीला टेंबलाईन पाशी सैन्य येऊन थांबले. या सैन्याबरोबर शिंदेकडे असलेली मेजर ब्राऊनरिंग यांच्या पाच फलटणी व तोफखाना होता. यामुळे शेवटी करवीरकरांना कोल्हापूर सोडून पन्हाळयांचा आश्रय घ्यावा लागला. म्हणून पन्हाळयावर रामचंद्र पटवर्धनाने हल्ला केला. यावेळी शुर सरदार विश्वासराव गायकवाड मारला गेला. हा करवीरकरांना मोठा धक्का बसला(८). तर जखमी झालेला दौलतराव गायकवाड ही मरण पावला. अशा बिकट परिस्थितीत कोल्हापूरकर होते, यावेळी कोल्हापूरचे सैन्य शिंदे, गोखले, कुरुंदवाडकर या तिन्ही फौजांची सुत्रे यावेळी परदेशी लष्करी अधिका-याकडे होती. दारुगोळा कमी पडू लागला. तर या फौजेमध्ये ताळमेळ उरला नाही. अशावेळेला शिवाजी महराजांनीर कठीण परिस्थितीत दौलतराव शिंद्याशी युध्द तहकुबीची बोलणी सुरु केली, तर याच वेळेला नाना फडणीसाचा मृत्यु झाला. आणि दुस-या बाजीरावाने रामचंद्ररावासच शिंद्यामार्फत कैद करण्याचा बेत आखला. याची बातमी लागताच ३० एप्रिल १८०० रोजी रामचंद्र रावास पळून जावे लागले. इतके दुरगामी परिण्ाम पट्टणुकुडीच्या लढाईचे झाले.

**समारोप :-**

कोल्हापूर छत्रपतींचा जरी या लढाईत विजय झाला तरी भाऊच्या मृत्यूच्या वार्तेने तासगांव पुणे येथील लोक फारच हळहळले. भाउुने अतुल पराक्रमाने पेशव्यांची सत्ता दक्षिणेत तेवत ठेवली होती, परंतु आता दक्षिण राखण्यासाइी भाऊ राहिला नाही, परिणामी कोल्हापूरकरांचे वर्चस्व अबाधीत राहिले.

**संदर्भ साधने :-**

१. गर्गे स. मा. :- करवीर रियासत (१९६८) पान नं.२४८.
२. सहस्त्रबुध्दे एस.डी. :- सरदार परशुराम भाऊ पटवर्धन (आर्यभूषण छापखाना)१९१२, पान नं.१७१
३. खरे जी.एच. :- इतिहास लेखसंग्रह व्हॉ.९ पत्र नं. ४८३४ ते ४८५६.
४. गुजर मा. वि. :- करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधणे भाग-८,१९६२, पृ. १२५.
५. सरदेसाई कुलकर्णी, काळे :- काव्ये इ तिहास संग्रह.
६. गर्गे स. मा. :- करवीर रियासत, १९६८, पान नं. २६५
७. खरे जी. एच. :- ऐतिहासीक लेख संग्रह भाग, ११, पान नं. ५८६७
८. खरे व्ही.व्ही. :- हिम्मत बहाद्दूर चव्हाण घराण्याचा इतिहास, पा.न.१०५